सिडको
शहरांचे शिल्पकार

**शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित**
कार्मिक विभाग
सिडको भवन, २ रा माळा, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई-४००६१४
दुरध्वनी क्रमांक: ०२२-६७९१८२५१ ईमेल: mp@cidcoindia.com

सिडको/व्य.(कार्मिक)/२०२२/ E-133557 दि. 11/०७/२०२२

## कार्यालयीन आदेश

**विषय :- सिडको सेवेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पदस्थापना, बदली याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी नागरी सेवा मंडळ स्थापन करण्याबाबत**

संदर्भ :- १.कार्मिक विभागाचा दि. १८.०६.२०१९ रोजीचा आदेश क्र सिडको/व्य (कार्मिक)/२०१९/PO(I)६३
२.मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट् पिटीशन (सिव्हील) क्रमांक ८२/२०११
३.महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५
४.सामान्य प्रशासन विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.२६/१२, दि. ३१.०१.२०१४

वरील विषयाच्या अनुषंगाने संदर्भ क्रं.२,३ आणि ४ मधील आदेश/सूचनां प्रमाणे संदर्भ क्र १ मध्ये नमूद कार्यालयीन आदेश निर्गमीत करण्यात आला होता. तथापि या कार्यालयीन आदेशानुसार संदर्भ क्र.१ मधील कार्यालयीन आदेश अधिक्रमीत करून सिडकोतील विविध संवर्गासाठी खालीलप्रमाणे नव्याने नागरी सेवा मंडळे गठीत करण्यात येत आहेत:

**१. अभियांत्रिकी संवर्ग :**

| अ.क्र. | पद |
|---|---|
| १. | सह व्यवस्थापकीय संचालक (प्रशासन) |
| २. | मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी नामनिर्देशीत केलेले सह व्यवस्थापकीय संचालक |
| ३. | मुख्य दक्षता अधिकारी |
| ४. | मुख्य अभियंता (नवी मुंबई) |

**२.लेखा संवर्ग :**

| अ.क्र. | पद |
|---|---|
| १. | सह व्यवस्थापकीय संचालक (प्रशासन) |
| २. | मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी नामनिर्देशीत केलेले सह व्यवस्थापकीय संचालक |
| ३. | मुख्य दक्षता अधिकारी |
| ४. | मुख्य लेखाधिकारी |

**३. परिवहन संवर्ग :-**

| अ.क्र. | पद |
|---|---|
| १. | सह व्यवस्थापकीय संचालक (प्रशासन) |
| २. | मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी नामनिर्देशीत केलेले सह व्यवस्थापकीय संचालक |
| ३. | मुख्य दक्षता अधिकारी |
| ४. | महाव्यवस्थापक (T&A) |

EE(NM)
14/7/22

CIDCO/CE(NMIA)
E.O.: 133557/13
Date: 11/07/22

11/07/22

४. नियोजन व वास्तुशास्त्रज्ञ संवर्ग :-

| अ.क्र. | पद |
|---|---|
| १. | सह व्यवस्थापकीय संचालक ( प्रशासन) |
| २. | मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी नामनिर्देशीत केलेले सह व्यवस्थापकीय संचालक |
| ३. | मुख्य दक्षता अधिकारी |
| ४. | मुख्य नियोजनकार |

५. सर्वसाधारण संवर्ग : (अभियांत्रिकी, लेखा, परिवहन, नियोजन व वास्तुशास्त्रज्ञ संवर्ग वगळून)

| अ.क्र. | पद |
|---|---|
| १. | सह व्यवस्थापकीय संचालक (प्रशासन) |
| २. | मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी नियुक्त केलेले सह व्यवस्थापकीय संचालक |
| ३. | मुख्य दक्षता अधिकारी |
| ४. | व्यवस्थापक (कार्मिक) |

सह-व्यवस्थापकीय संचालक संवार्गातील सर्वात जेष्ठ अधिकारी संबंधीत संवर्गासाठी नेमण्यात आलेल्या नागरी सेवा मंडळाचे अध्यक्ष राहतील. मुख्य दक्षता अधिकारी तसेच मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी नियुक्त केलेले सह व्यवस्थापकीय संचालक मंडळाचे सदस्य राहतील. संबंधीत विभागप्रमुख मंडळाचे सदस्य सचिव राहतील. व्यवस्थापक (कार्मिक) सर्वसाधारण संवर्गाकरीताच्या नागरी मंडळाचे सदस्य सचिव राहतील.

**संबंधीत मंडळाच्या सदस्य सचिवांनी सह-व्यवस्थापकीय संचालक यांना नामनिर्देशीत करण्याकरीता स्वतंत्रपणे मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांची मंजूरी घ्यावी.**

६. त्याचप्रमाणे महामंडळाच्या दि. ०६.११.२०१५ रोजीच्या ठराव क्र. ११४७९ प्रमाणे संवर्गानुसार खालीलप्रमाणे नियुक्ती प्राधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे:-

**सक्षम प्राधिकारी :-**

| अ.क्र. | संवर्ग | सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|
| १. | विकास अधिकारी व त्यावरील पदे | मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक |
| २. | सहा. विकास अधिकारी व त्याखालील पदे | मा. सह व्यवस्थापकीय संचालक (प्रशासन) |

मुद्दा क्र.१ ते ५ मध्ये नमूद केलेल्या संवर्गासाठीची नागरी सेवा मंडळे संवर्गनिहाय मुद्दा क्र. ६ मध्ये नमूद केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडे मंडळाच्या शिफारसी मान्येतेस्तव सादर करतील.

**संबंधित नागरी सेवा मंडळाचे कार्य (Scope of Work):**

शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन २००५, अन्वये पदस्थापना तसेच सिडकोतील एकाच विभागामध्ये सलग तीन वर्षे सेवा पूर्ण करणाऱ्या अथवा प्रशासकीय कारणास्तव बदली करणे अपेक्षीत असणाऱ्या, गंभीर स्वरुपाची तक्रार असणाऱ्या, दिव्यांग असणाऱ्या, आरोग्य विषयक तक्रारींमुळे-कौटुंबिक अडचणींमुळे बदलीसाठी निवेदन करणाऱ्या,पती-पत्नी एकत्रिकरणासाठी अर्ज करणाऱ्या, अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बदली अथवा शासनाकडून बदल्यांबाबत वेळोवेळी प्राप्त बदल्यांचा कालावधी विचारात घेऊन संबंधित संवर्गाचे सदस्य सचिव वरील अटींची पूर्तता करणाऱ्या बदलीसाठी तसेच पदस्थापनेसाठी पात्र अधिकारी/कर्मचाऱ्यांची सुची तयार करून संबंधित नागरी सेवा मंडळाकडे सादर करतील.

11/07/22

संबंधित नागरी सेवा मंडळ, प्रस्तावित केलेल्या बदल्यांची शिफारस मुद्दा क्र. ६ मध्ये नमूद केलेल्या सक्षम प्राधिकारी यांच्याकडे मान्यतेस्तव सादर करतील. सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेनंतर संबंधित विभागप्रमुख(संयोजक) बदल्यांबाबत कार्यालयीन आदेश निर्गमित करतील.

वरील कार्यालयीन आदेश मा.व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या आदेशाने निर्गमित करण्यात येत आहे.

व्यवस्थापक (कार्मिक) 11/07/22

**प्रती :-**

१. मुख्य अभियंता (नवी मुंबई)
२. मुख्य लेखा अधिकारी
३. मुख्य वास्तूशास्त्रज्ञ व नियोजनकार
४. महाव्यवस्थापक (T&A)

**प्रत माहितीस्तव :**

१. मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे वि.का.अ.
२. मा. सह व्यवस्थापकीय संचालक -१ यांचे स्वीय सचिव
३. मा. सह व्यवस्थापकीय संचालक -२ यांचे स्वीय सचिव
४. मा. मुख्य प्रशासक (नवीन शहरे)
५. मा. मुख्य दक्षता अधिकारी यांचे स्वीय सचिव
६. सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख